# मार्गिका वेळेत सुरू होणे गरजेचे

मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेवर अतिगर्दीचा ताण कित्येक वर्षांपासून पडत आहे. मेट्रोमुळे हा ताण कमी होण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. त्यामुळे जितक्या लवकर मेट्रोच्या विविध मार्गिका सुरू होतील, तितका मुंबईकरांना दिलासा मिळणार आहे. या नियोजित मेट्रो मार्गात मेट्रो ३ ही भूमिगत मार्गिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे. कारण पश्चिम उपनगरांतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांवरील गर्दी कमी करण्यात ही मार्गिका मोलाची कामगिरी बजावणार आहे. मात्र आरे कारशेडसंबंधी निर्माण झालेल्या वादानंतर या मार्गिकेला दोन वर्षांचा विलंब झाला आहे. आता हळूहळू या मार्गिकेसाठी गाड्या दाखल होणे व त्या सज्ज करण्याची तयारी आदी कामांना सुरुवात झाली आहे. त्यामुळे ही मार्गिका नुकत्याच केलेल्या घोषणेप्रमाणे डिसेंबर महिन्यात सुरू व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त आहे. त्यासाठी संबंधित यंत्रणांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.